July 2021

E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFEREED & INDEXED JOURNAL

Special Issue 270

**Multidisciplinary Issue**



**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Dr. Tejesh Beldar**, Nashikroad (English)
**Dr. Gajanan Wankhede**, Kinwat (Hindi)
**Mrs. Bharati Sonawane**, Bhusawal (Marathi)
**Dr. Rajay Pawar**, Goa (Konkani)

RESEARCH JOURNEY

I
T
E
R
N
A
T
I
O
N
A
L
R
S
E
A
R
C
H
F
E
L
L
W
S
A
S
S
O
C
I
A
T
I

CHAKAN 410501
Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-P

E-ISSN : 2348-7143
July- 2021


| | | | |
|---|---|---|---|
| 24 | बाल साहित्य में आदर्श बोध | डॉ. संतोष पवार | 117 |
| 25 | शोषित पीड़ितों के कवि राजेश जोशी | डॉ. कल्पना पाटील | 121 |
| 26 | वर्तमान जगत में परिवर्तनशीलता की साक्ष्य देता : नारी विमर्श | डॉ. रुपाली चौधरी | 126 |
| 27 | अनुवाद की प्रक्रिया, तकनीक और समस्याएँ | डॉ. लियाकत शेख | 130 |
| 28 | वैश्वीकरण में हिंदी की स्थिति और दिशा | डॉ. संतोष पवार | 136 |
| 29 | फिचर लेखन | प्रा.अरुण आहेर | 140 |


## मराठी विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| 30 | आदिवासींची देवबांधणी : एक विधीनाट्य | डॉ. अंजली मस्करेन्हस | 143 |
| 31 | आदिवासी कोळी लोकमानसातील धार्मिक सण, समारंभाची पारंपारिक गीते | डॉ. एस. एस. भैरगुंडे | 147 |
| 32 | संत तुकारामांच्या अभंगातील सामाजिक फलश्रुती | डॉ. रामलाल चौधरी | 153 |
| 33 | महाराष्ट्रातील संतांचे समाजप्रबोधनाचे कार्य | डॉ. कैलास वाघ | 158 |
| 34 | धर्मभोळेपणाचा नाश करणारा सत्यशोधक विचार | डॉ. श्रीराम गडकर | 164 |
| 35 | मराठी साहित्य आणि जीवनमूल्य : एक शोध | डॉ. नामदेव सोडगीर | 174 |
| 36 | 'लढत' कादंबरीचा अभ्यास : चिकित्सक अभ्यासाचे एक आदर्श प्रारूप | डॉ. शिवाजी एंडाईत | 178 |
| 37 | विठ्ठल वाघांच्या कवितेतील द्विकेंद्रीतता | डॉ. श्रीराम गव्हाणे | 182 |
| 38 | विदर्भाच्या मराठी गझलेतील कृषी जाणीव | डॉ. संजय पोहरे | 187 |
| 39 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर आणि चर्मकार समाज | डॉ. आर.एस.सुरवसे | 191 |
| 40 | शांताबाई हुबळीकर यांच्या 'आता कशाला उद्याची बात' मधून व्यक्त होणारा स्त्रीवाद | डॉ. अमृता डोर्लीकर | 194 |
| 41 | २००० नंतरच्या ग्रामीण कादंबऱ्यांचे स्वरूप आणि विशेष | डॉ. शिवाजी हुसे | 200 |
| 42 | विजय पाटील यांचे ग्रामीण कथा विश्व | डॉ. पद्माकार वानखेडे | 206 |
| 43 | वर्तमानातील आदिवासी कवितेतील संवेदना (१९९५ ते २०२०) | डॉ. प्रकाश वट्टी | 210 |
| 44 | स्त्रियांचे ग्रामीण कादंबरीलेखन | डॉ. राजेंद्र वडमारे | 216 |
| 45 | संत गाडगेबाबांच्या कीर्तनातील वैज्ञानिक दृष्टी | डॉ. सौ. रजनी लुंगसे | 224 |
| 46 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या साहित्यातील मानवी मूल्ये | प्रो. डॉ. वासुदेव वले, प्रा. छाया खर्चे | 227 |
| 47 | माणगाव परिषद : स्वरूप व परिणाम | डॉ. श्रीराम गडकर | 230 |
| 48 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि दलित चळवळ | प्रा.आर.एस.लोहकरे | 240 |
| 49 | विदर्भातील मराठी गझल : आशय आणि अभिव्यक्तीच्या अंगाने स्वतंत्र वाटचाल करणारे निवडक गझलकार | डॉ. संजय पोहरे | 245 |
| 50 | स्त्रियांची समकालीन प्रवासवर्णने : काही निरीक्षणे | मनीषा औटी | 253 |
| 51 | स्वातंत्र्योत्तर मराठी व हिंदी भाषांमधील दलित कथांचा एकमेकांशी तुलनात्मक अभ्यास | डॉ. अर्जुन नेरकर | 259 |
| 52 | भारतीय महिलांची बदलती स्थिती | डॉ. अनंत देशमुख | 262 |
| 53 | मराठवाड्यातील चळवळी व त्यांनी मराठवाड्यातील कादंबरीला दिलेले वैशिष्ट्ये | [illegible] | 267 |


Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan,Tal-Khed,Dist-Pune.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Special Issue - 270 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
July- 2021

# 'लढत' कादंबरीचा अभ्यास : चिकित्सक अभ्यासाचे एक आदर्श प्रारूप

प्रा. डॉ. शिवाजी एंडाईत
सहयोगी प्राध्यापक,
कला व वाणिज्य महाविद्यालय, चाकण.
चलभाष : 9763895220, 8857867229
Email :

'लढत : एक चिकित्सक अभ्यास' हा संशोधनपर ग्रंथ अक्षरवाड्.मय प्रकाशनाने २०१८ मध्ये प्रकाशित केला आहे. सुधाकर शेलार यांनी १९९४ -९५ मध्ये एम.फिल. च्या निमित्ताने जो संशोधनात्मक अभ्यास केला, त्याचे फलित म्हणजे हा ग्रंथ होय. प्रसिद्ध साहित्यिक शिवाजी सावंत यांची 'लढत' ही चरित्रात्मक कादंबरी आहे. अभ्यासकाने -'चरित्रात्मक कादंबरी व चरित्र : तात्त्विक मीमांसा', 'लढत कादंबरीतील चरित्रनायक', 'चरित्रनायकाची वास्तव प्रतिमा', 'लढत कादंबरी : वाड्.मयीन मूल्यमापन' आणि 'उपसंहार'- अशा एकूण पाच प्रकरणांतून या चरित्रात्मक कादंबरीची चिकित्सा केली आहे.

हा अभ्यास करीत असताना अभ्यासकाने चरित्र आणि चरित्रात्मक कादंबरी या साहित्यप्रकारांचा सांगोपांग विचार केला आहे. या साहित्यप्रकाराची तात्त्विक मीमांसा करताना 'चरित्र' व 'चरित्रात्मक कादंबरी' या साहित्यप्रकाराच्या निर्मितीमागील प्रेरणांचा शोध घेत अभ्यासकाने स्वरूपवैशिष्ट्ये व मर्यादांचे स्वरूप विशद केले आहे. 'चरित्र' संकल्पनेत 'व्यक्तिजीवनाला' व 'व्यक्तिजीवनाच्या इतिहासालाच' केंद्रवर्ती स्थान असते, हे लक्षात घेऊन अभ्यासकाने विविध मतमतांतराची चर्चा करीत 'चरित्र' साहित्यप्रकाराची पुढील व्याख्या दिली आहे. ''ज्यात व्यक्तिजीवनाला (अर्थात पूर्वी वास्तवात घडून गेलेल्या), व्यक्तिभावजीवनाला व व्यक्तीच्या कृतीउक्तीला प्राधान्य असते व हे तीनही घटक ज्यात कलात्मकतेने एकत्र गुंफलेले असतात, त्या लेखनाला 'चरित्र' असे म्हणतात.''[१] माणूस हा विचारशील व समाजशील प्राणी असल्याने त्याच्या कृतीउक्तीला अनेक ऐहिक संदर्भ प्राप्त होत असतात. साहजिकच चरित्रलेखनामागेही हे संदर्भ दिसून येतात. चरित्रलेखनामागील प्रयोजनांचा विचार करता हे संदर्भ वैविध्य अधिकच जाणवते. ''कुणी 'आदर्श-निर्मिती' हे प्रयोजन मानतो, तर कुणाची 'आत्माविष्कार' व 'आनंदनिर्मिती' ही प्रयोजने असतात. तर कुणाचा 'गतस्मृती टिकविणे' हा उद्देश दिसून येतो, तर काहींना चरित्रनिर्मितीतून 'अर्थप्राप्ती' साध्य करायची असते.''[२] या सर्व प्रेरणा-प्रयोजनांतून अभ्यासकाने चरित्र हा साहित्यप्रकार कसाकसा विकसित होत गेला, या संबंधीची चर्चा ग्रंथारंभी केली आहे. जेव्हा एकेका प्रयोजनावर भर देऊन चरित्रलेखन केले जाते, तेव्हा त्यात स्वाभाविकपणे स्वरूपभेदही निर्माण होत जातात; त्यामुळे प्रचलित 'चरित्र' या साहित्यप्रकाराचे ठरावीक मानदंड निश्चित करता येत नाहीत, या निष्कर्षाप्रत लेखक येतो.

चरित्रात चरित्रनायकाचे स्वभावदर्शन, त्याच्या आयुष्यातील घटना-प्रसंग, इतिहास, समकालीन परिस्थिती आदींचा वेध चरित्रकार घेत असतो, तेव्हा आपोआपच चरित्रात लालित्याचा प्रवेश होतो. ललित साहित्यात कलात्मकता असते. लेखक वास्तवापासून काहीसा दूर गेलेला असतो. तो स्वातंत्र्य उपभोगत असतो. मात्र चरित्रकाराने कलात्मकतेसाठी असे स्वातंत्र्य घेतले तरी, त्याला सत्याच्या, वास्तवाच्या मर्यादा पाळाव्याच लागतात. चरित्रातील लालित्याविषयीची ही मर्यादा अभ्यासकाने इथे नोंदविली आहे. चरित्रनायकाला केन्द्रस्थानी ठेवून त्याच्या विकासाचा आलेख लालित्यपूर्ण रीतीने रेखाटला तरच, चरित्रलेखनाचे उद्दिष्ट साध्य होईल, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कादंबरीत कथासूत्र, व्यक्तिचित्रण, घटना-प्रसंग, विशिष्ट भूप्रदेश,

Principal
C.S.M.S. Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed Dist-Pune.